# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर   **P.S.(ठाणे):** कोडोली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0063   **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 18/03/2026 11:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार   **Date From (दिंनाक पासून):** 26/12/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 26/12/2025
**Time From (वेळेपासून):** 15:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 18/03/2026   **Time (वेळ):** 11:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 012
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 18/03/2026 11:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 6 किमी   **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सातवे ,पन्हाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हणमंत शंकर बदडे | | | 1. उलपे एरीया बक साईड,कसबा बावडा,,करवीर,शाहुपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दिंनाक - 18/03/2026

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष कोडोली पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे हजर राहुन फिंयाद देतो की,

मी दिंनाक 26/12/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी 10.00 वा चे सुमारास बोलावुन घेवुन, तक्रारदार सोमनाथ पांडुरंग निकम रा.सातवे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यांची लाचेच्या अनुषगाने तक्रार असुन, त्यांचा मोबाईल क्रमांक 8668721457 मला दिला. तक्रारदार यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश आम्हाला दिला. त्यावेळी आम्ही त्यांचे वरील नमुद मो.क्र.वरती फोन करून, त्यांचे तक्रारीबाबत विचारणा केली असता, त्यांनी हकीकत सांगितली की, माझे मालकीचे सातवे गावातील गट नं.1735 मधील जमीन विक्री केली होती. परंतु सदर जमिनीचे काही रक्कम ही मला प्रकाश जाधव व पांडुरंग पाटील हे देणे असलेने प्रकाश जाधव व पांडुरंग पाटील यांनी मला सदर गट नंबरमधील 36 गुंठयामधील साधारण प्रत्येक प्लाट हा 1 गुंठे क्षेत्राचा असलेला, असे 08 प्लॉटची विक्री करण्याबाबतचे वटमुख्त्यापत्र करून दिलेले होते. त्याप्रमाणे मी नमुद गट नंबर मधील 08 प्लॉट पैकी 04 प्लॉटची विक्री केली व उरलेले 04 प्लॉटची विक्री करणे बाकी आहे. विक्री करणेत आलेल्या प्लॉटमधील एक खरेदीदार उत्तम विश्वनाथ गाताडे यांना मी विक्री केलेल्या प्लॉटचे क्षेत्रापेक्षा, जास्त क्षेत्र हे त्यांचे खरेदी दस्तावर नोंदणी झालेले होते. त्यामुळे उरलेले 4 प्लॉटला कोणतेही क्षेत्र शिल्लक नसलेचे 7/12 पत्रकी फेरफार क्रमांक 8421 प्रमाणे दिसत नव्हते. त्यामुळे या चुकीचे फेरफार नोंदीचे दुरूस्ती करीता, मी तलाठी सजा सातवे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर येथे 7/12 पत्रकी चुकीची फेरफार नोंद दुरूस्ती होणेबाबतचा अर्ज दिला होता. त्या कामाकरीता तलाठी सजा सातवे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर या तलाठी सजा कार्यालयातील तलाठी बदडे साहेब यांनी माझेकडे 10,000/- रूपये लाच रकमेची मागणी केली केलेने,तलाठी बदडे साहेब यांना नाईलाजाने दि.12/12/2025 रोजी पन्हाळा येथे भेटुन 4,000/- रूपये लाच रक्कम दिली होती. त्यानंतरही आमचे वर नमुद गट नंबर मधील क्षेत्रामध्ये तलाठी बदडे साहेब यांनी दुरूस्ती केली नसलेने, मी त्यांची भेट घेतली असता, तलाठी बदडे साहेब यांनी उरलेली 6,000/- रूपयेची लाच रकमेची मागणी माझेकडे केली. 6,000/- रूपये दिलेनंतरच गट नं. 1735 मध्ये उत्तम विश्वनाथ गाताडे यांचे नावे लागलेले जास्तीचे क्षेत्राची 7/12 पत्रकी दुरूस्ती करणेत येईल, असे मला सांगितले. तलाठी बदडे यांनी यापुर्वी माझेकडुन घेतलेले 4,000/- रूपये हे व आता माझेकडे मागणी करत असलेले 6,000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी, म्हणुन तक्रार सांगितली. त्यावेळी तक्रारदार यांनी ते दिंनाक 26/12/2025 रोजी तलाठी बदडे यांना दुपारी 3.30 वा चे सुमारास भेटणेस, त्यांचे सातवे येथील कार्यालयात जाणार आहेत असे सांगून, त्यांनी आम्हास आरळे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर गावचे अलीकडे रस्त्याचे लगत असले मोकळया जागेत येण्यास सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. अधीक्षक अभियता, महावितरण, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने, शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय पंच आलेनंतर, आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. आम्ही पंच व सापळा पथक यांना तक्रारदार निकम यांचे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगून, पुढील कारवाई आरळा, ता. पन्हाळा येथुन करणेची आहे असे सांगीतले. त्यानंतर आम्ही, पंच, सापळा पथक असे आवश्यक ती साधन सामुग्री घेवुन शासकीय वाहन क्रमांक महिन्द्रा बोलेरो क्रमांक MH.09 GU 7591 मधुन 11.20 वाजता निघुन केर्ले - वाघबील- बोरपाडळे मार्गे आरळा, ता.पन्हाळा येथे आलो. आम्ही तक्रारदार निकम यांना त्यांचे मोबाईलवरून संपर्कात होतो. आरळा येथे आलेनंतर तक्रारदार निकम हे आम्हास भेटले,त्यांचे पुर्ण नाव सोमनाथ पांडुरंग निकम वय - 41 व्यवसाय - शेती व प्लॉट खरेदी विक्री रा.सातवे ता.पन्हाळा जि.कोल्हापूर असे असल्याचे सांगीतले.

आम्ही तक्रारदार निकम यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेशी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून निकम यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. निकम यांनी त्यांचा लेख तक्रारी अर्ज आमच्याकडे दिला. निकम यांनी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार व पंच नं.01 चंद्रकांत मोहिते यांचेसह सर्वप्रथम सजा सातवे, ता.पन्हाळा येथील, तलाठी बदडे हे तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची निकम व पंचाची खात्री करून दिली व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार निकम व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 15.35 वाजता चालु करून, तो तक्रारदार निकम यांचे गळयात काळ्या दो-याच्या साहयाने अडकवुन, निकम व पंच नं.1 मोहिते यांना तक्रारदार यांची बजाज सीटी 100 मोटार सायकल नं. एमएच 09 सी.एक्स. 0905 वरून तलाठी सजा सातवे ता. पन्हाळा येथे ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) बदडे यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 अमोल निचिते असे शासकीय वाहनात थांबुन राहीलो. तक्रारदार निकम व पंच नं.1 मोहिते असे काहीवेळाने, आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 16.43 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 चंद्रकांत मोहिते, यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत तलाठी सजा सातवे ता.पन्हाळा येथे ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) बदडे यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, मोहिते यांनी सांगितले की, ते तक्रारदार यांचेसोबत तलाठी सजा सातवे ता. पन्हाळा येथे गेले. त्यावेळी तेथे तक्रारदार निकम व तलाठी बदडे यांची भेट झाली, त्यावेळी त्यांचेत तक्रारादर यांचे सात बारा दुरूस्तीचे कामाचे, फेरफार नोंदीचे, कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी ग्राम महसुल अधिकारी बदडे 'याच्या नोंद करून जातंय, सर्कलची माझी सही न, तसं जातंय. मग मॅडमचा थम...' असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम, 'मग आता परवा तुम्हाला दिले होते की चार हजार दिले होते ना? मग अजून काय द्यावे लागणार का त्यात?...' असे म्हणाले. त्यावर बदडे, 'मला काय नको' असे म्हणाले. त्यावेळी निकम, 'अं..' असे म्हणाले. त्यावर बदडे 'उरलेलं ते आपलं...' असे म्हणाले. त्यावर निकम11 pt 'उरलेले..'असे म्हणाले. त्यावर बदडे 'हु...' असे म्हणाले. तक्रारदार निकम 'दहा म्हटला होता ना तुम्ही?...' असे म्हणाले. त्यावर बदडे 'हु...' असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार निकम 'म्हणजे 5-5 असे दोन म्हटला होता, चार दिले होते, राहिले सहा आणि हे त्यातच होतंय का हे ?' असे म्हणाले. त्यावेळी बदडे 'कस त्या होईल सर्कलला कायचं दयायला नाही...' असे म्हणाले. त्यावळी तक्रारदार निकम 'अं...' असे म्हणाले. त्यावर बदडे 'सर्कल...'असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम 'सर्कलचं ते म्हणतंय त्यांचं ते बघतो म्हणतंय' असे म्हणाले. त्यावेळी बदडे 'याचं ऐवढं करून घ्या...' असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम 'ह्याचं काय हे होणार आणि? ह्याचं? त्यांना काय द्यावं लागणार आणि?...' असे म्हणाले. त्यावेळी बदडे 'ते नंतर, मी सांगतो की प्रकाशला...' असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा तक्रारदार व तलाठी बदडे यांचेत निकम यांचे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी निकम " उलठ लागलं सगळं, आता हे तुम्हाला हे करायला पाहिजे का? तुमचं द्यायलाच पाहिजे" असे म्हणाले. त्यावेळी बदडे "मग मागचं पेंडिंगच द्या की, बघा तुमची इच्छा असली तर.."असे म्हणाले. तक्रारदार यांचे प्रलंबित कामासाठी 7/12 दुरूस्ती साठीचा अर्ज नवीन टाईप करून, सोमवार दि.29/12/2025 रोजी घेवून येण्याचे अनुषंगाने बोलने झाले. त्यानंतर मी व तक्रारदार निकम असे परत आलो आहे,अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार निकम यांना तलाठी बदडे यांना भेटण्यास गेले नंतर, काय हकीकत घडली याबाबत विचारले असता, त्यांनी पंच नं. 1 मोहिते यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार निकम व तलाठी बदडे यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार निकम यांचे सजा तलाठी कार्यालय, सातवे येथे काम प्रलंंबित असुन, ते काम ग्राम महसुल अधिकारी (बदडे) यांचेकडे असुन, तक्रारदार यांचे काम करून देण्यासाठी, तलाठी बडदे यांनी तक्रारदार यांचेकडे 10,000/- रूपये लाच रकमेची मागणी करून, तक्रारीपुर्वी तक्रारदार यांचेकडुन 4,000/- रूपये लाच रक्कम स्विकारून उरलेले 6,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच तक्रारदार यांचे प्रलंबित कामासाठी, व 7/12 दुरूस्ती साठीचा नवीन अर्ज टाईप करून दि.29/12/2025 रोजी घेवून येण्यास सांगितले असलेचे निषन्न झाल्याने, चालु कारवाई तात्पुरती स्थगीत केली व पुढील कारवाई दिंनाक 29/12/2025 रोजी करण्याचे आहे असे सांगितले. पडताळणी कारवाईचा सविस्तर पचनामा केला आहे.

दिंनाक 29/12/2025 रोजी तक्रारदार यांनी आम्हास ग्राम महसुल अधिकारी बदडे साहेब हे निवडणुक डयुटीचे ट्रेनिंगकरीता पन्हाळा तहसिलदार कार्यालय येथे गेले असल्याचे सांगून, ते दिंनाक 30/12/2025 रोजी तलाठी सजा सातवे कार्यालयात येणार असलेचे कळविले. त्यावेळी आम्ही त्यांना तलाठी बदडे हे कार्यालयात आलेनंतर, आम्हास कळविणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे निकम यांनी तलाठी बदडे हे दिंनाक 30/12/2025 रोजी कार्यालयात आलेबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही दिंनाक 30/12/2025 रोजी सापळा पथक व पंचासह पुर्वी थांबलेल्या ठिकाणी येवुन, निकम यांना भेटलो. त्यानंतर सदर दिवशी ग्राम महसुल अधिकारी बदडे यांनी तक्रारदार यांचेकडे केलेल्या लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई आयोजीत केली होती. सदर सापळा कारवाईमध्ये सजा सातवे कार्यालयात तक्रारदार व तलाठी बदडे यांची भेट होऊन, त्यांचेत कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी बदडे यांनी निकम यांना त्यांच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स घेवुन येण्यास सांगितले. निकम हे झेरॉक्स घेवुन आले, त्यावेळी बडदे हे कार्यालयात नव्हते म्हणुन, निकम यांनी बडदे यांचे मो.नं. 9112921373 वरती फोन केला. त्यावेळी त्यांनी निकम यांना ते कोडोली मंडळ अधिकारी कार्यालय, येथे आल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार हे कोडोली मंडळ अधिकारी कार्यालय येथे आले. त्यावेळी निकम व बडदे यांचेत भेट झाली. त्यांचेत पुन्हा निकम यांचे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. तक्रारदार निकम यांनी तलाठी बडदे यांनी यापुर्वी मागणी केलेले, सहा हजार रूपये त्यांना देत असताना, तलाठी बडदे यांनी लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारणेस त्यांनी नकार दिलेने, आम्ही त्यादिवशीची सापळा कारवाई स्थगित केली. सदर कारवाईचा सविस्तर पंचनामा केला आहे. तक्रारदार यांचेशी ग्राम महसुल अधिकारी बदडे हे जेंव्हा संपर्क करतील, तेंव्हा पुन्हा सापळा कारवाई करणेचे ठरविले. त्यानंतर आम्ही वेळोवेळी तक्रारदार निकम यांचेशी फोनवरून संपर्क साधुन बदडे यांचेकडुन काही निरोप आला आहे का, याबाबत माहिती घेत होतो. परंतु त्यांचा काही निरोप आला नसल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दिंनाक 25/02/2026 रोजी तक्रारदार निकम यांचा जबाब घेतला असता, त्यांनी दिंनाक 26/12/2025 रोजी व दिंनाक 30/12/2025 रोजी केले कारवाईप्रमाणे हकीकत सांगितली. तलाठी बदडे हे माझेकडे मागणी केलेले लाच रक्कम घेतील, असे मला वाटत होते. परंतु बडदे यांना संशय आला असल्याचे, मला आता वाटत असल्याने, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) बडदे यांनी यापुर्वी माझेकडे मागणी केलेले 6,000/- रू ते माझेकडुन स्विकारतील, असे त्यांना वाटत नाही. तरी पुढील कायदेशीर कारवाई करावी, म्हणुन जबाब नोंदवण्यात आला आहे.

यातील मुळ तक्रारदार सोमनाथ पांडुरंग निकम यांनी तलाठी सजा सातवे, ता. पन्हाळा येथे त्यांनी विक्री केलेल्या प्लॉटचे क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र, हे त्यांचे खरेदी दस्तावर नोंदणी झालेले होते, त्यामुळे चुकीचे फेरफार नोंदीचे दुरूस्ती करीता, अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे दुरूस्ती करणेकरीता ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) बडदे सजा सातवे यांनी, तक्रारदार निकम यांच्याकडे बेकायदेशीरपणे 10,000/- रूपयांची मागणी करून, त्यातील 4,000/- रूपये लाच रक्कम तक्रारीपुर्वी, स्विकारल्याचे मान्य करून, राहीलेले 6,000/- लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.म्हणुन माझी  हणमंत शंकर बडदे, वय 55 वर्षे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा, सातवे, ता.पन्हाळा, सध्या रा.अभिरुची बिल्डींग उलपे एरीया बॅक साईड गंगामिल्क शेजारी पाचवा मजला कसबा बावडा मुळ रा.विराज रो हाऊस गजानन प्रसाद, युनिट क्रमांक 4, कसबा बावडा, ता. करवीर जि.कोल्हापूरयांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिंयाद आहे.

माझा वरील जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष                                                                 हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Kailas Jaywant kodag(I (Inspector)) / PNMAH52874 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kailas Jaywant koda
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH52874